ISBN - 978-93-82995-62-3

# सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती

## (Research Methodology in Social Sciences)

संपादक

प्राचार्य डॉ. बाळ कांबळे

सहसंपादक

प्रा. डॉ. दत्तात्रय चौधरी

प्रा. डॉ. संतोष लगड

Scanned with CamScanner

'ज्ञानासाठी शोध' या अर्थानेच 'संशोधन' हा शब्द सर्वसामान्य व्यवहारात रूढ आहे. विविध क्षेत्रातील बौद्धिक आणि व्यावहारिक समस्यांची उत्तरे शोधून काढणे हा संशोधनाचा मुख्य उद्देश आणि प्रयत्न असतो. संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. वर्तमान ज्ञानात नवीन ज्ञानाची भर घालणे हे संशोधनाचे मुलभूत कार्य आहे. अविरत संशोधन आणि त्यावर आधारित निष्कर्ष याद्वारे समाज उन्नत अवस्थेत पोहचला आहे. आणि त्याचद्वारे भविष्यकाळात सुद्धा समाजाची उन्नती होणार आहे. सर्व प्रकारची संशोधने प्रामुख्याने समाज जीवनाशी निगडीत असतात. मानवी वर्तणूक हाच सामाजिक जीवनाचा आधार असल्यामुळे सामाजिक संशोधनामध्ये शंभर टक्के अचूकता आणता येत नाही. पण समाजाचे स्वरूप आणि कार्यपद्धती जाणून घेण्याच्या निकडीतून अशी संशोधने केली जातात.

विकसित राष्ट्राच्या तुलनेत विकसनशील देशात सामाजिक क्षेत्रात संशोधन होणे गरजेचे आहे. भारतात आज देखील मोठ्या प्रमाणात धार्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात अनेक समस्या उभ्या आहेत. अनेक प्रथा, परंपरा या देशात पूर्वीपासून आजतागायत सुरू आहेत. जगात आधुनिकतेचे वारे वाहत असताना या समस्या सोडविणे तितकेच गरजेचे आहे. तसेच समाजात घडून येणाऱ्या घटना किंवा निर्माण होणाऱ्या समस्या यांचे अध्ययन करण्यासाठी संशोधन महत्त्वाचे आहे. याच उद्देशाने सामाजिक शास्त्रांतर्गत येणाऱ्या इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, मानसशास्त्र आणि समाजशास्त्र इत्यादी शाखेतील प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक, विद्यार्थ्यांना संशोधनाची आवड निर्माण करून देण्याच्या उद्देशाने 'Research Methodology in Social Sciences' या विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. अनेक संशोधकांनी सादर केलेल्या शोध निबंधांचा समावेश या ग्रंथात केला आहे. त्याचा फायदा अनेक प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक, विद्यार्थ्यांना होईलच यात शंका नाही. त्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरणार आहे.

– संपादक

अनुराधा पब्लिकेशन्स्
ISBN - 978-93-82995-62-3
₹ 200/-

Scanned with CamScanner